ePaper

# आमचे नाणे खणखणीत, शशिकांत शिंदे लोकसभेत जातील : शरद पवार



|| वर्ष - 7 । अंक - 326 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 16 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- दिनेश कार्तिकची झुंज व्यर्थ!
- नेहा धुपिया झाली अवाक
- 'RBI बँक सरकारची चीअर लीडर'
- शाह यांचं भाजपातील स्थान काय?



## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

# 'सीबीएसई' शाळांत 'क्रेडिट सिस्टीम'!

### » पाच विषयांसाठी 40 क्रेडिट : विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाला चालना

। पुणे । महाईन्यूज

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळांमध्ये सहावी, नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या गुणांसाठी क्रेडिट सिस्टीम राबवली जाणार आहे. या प्रणाली अंतर्गत सहावीच्या विद्यार्थ्याला ४० क्रेडिट, तर नववीच्या विद्यार्थ्याला ४० ते ५४ क्रेडिट आणि अकरावीच्या विद्यार्थ्याला ५० ते ४७ क्रेडिट दिले जाणार आहेत. येत्या शैक्षणिक वर्षापासून २०२४-२५ हा बदल लागू करण्यात येणार आहे.**



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय आणि उच्च शिक्षणात वेगवेगळे बदल केले जात आहेत. त्यानुसार नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क (एनसीआरएफ) अंतर्गत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी पावले उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून शाळांमध्ये क्रेडिट सिस्टीम लागू करण्यात येणार आहे. सुरुवातीला पथदर्शी प्रकल्प म्हणून देशातील काही शाळांत सहावी, नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी क्रेडिट सिस्टीम राबवली जाणार आहे. सहावीच्या विद्यार्थ्यांना नऊ विषयांसाठी एकूण ४० क्रेडिट असतील. विद्यार्थ्यांना सर्व विषयांत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. दुसरी अट म्हणजे वर्षभरात वर्गात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य राहणार आहे.

### नववीत 40 ते 54 क्रेडिट

या प्रणालीअंतर्गत नववीत वर्षभरातून २१० तास प्रत्येक विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला ४० ते ५४ क्रेडिट प्रदान केले जाणार आहेत. विद्यार्थ्याला इयत्ता उत्तीर्ण होण्यासाठी दोन भाषा आणि तीन मुख्य विषय अशा एकूण विषयांत पाच विषयांत उत्तीर्ण होणे गरजेचे आहे.

### पाच विषयांसाठी 40 क्रेडिट

विद्यार्थ्यांनी पाच विषय घेतल्यास त्यांचा २१० प्रति विषयाप्रमाणे एक हजार ५० तास अभ्यास होतो. यात १५० तास अंतर्गत मूल्यांकन, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव आणि सामान्य अभ्यासासाठी असेल. प्रत्येक विषयासाठी एकूण सात क्रेडिट राहतील. विद्यार्थी पाच विषयांत उत्तीर्ण झाल्यास, त्याला ४० क्रेडिट मिळतील. विद्यार्थ्याने सहा किंवा सात विषय घेतल्यास, क्रेडिट ४७ किंवा ५४ पर्यंत मिळतील.

### अकरावीतही क्रेडिट मिळणार

» अकरावीतही विद्यार्थ्यांना क्रेडिट मिळणार असून, त्यासाठी विद्यार्थ्याला पाच विषयांत उत्तीर्ण व्हावे लागेल. या विषयात एक भाषा विषय आणि चार मुख्य विषय असतील. विद्यार्थी या पाच विषयांत उत्तीर्ण झाल्यास विद्यार्थ्यास ४० क्रेडिट दिले जातील. नववीप्रमाणे अकरावीत अंतर्गत मूल्यांकन, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव आणि सामान्य अभ्यासासाठी १५० तास असतील. मंडळाने दिलेली पात्रता विद्यार्थ्याने पूर्ण केल्यास, त्याच्या सहाव्या विषयाचे गुण ग्राह्य धरण्यात येतील. त्यानुसार विद्यार्थ्याला ४७ क्रेडिट मिळणार आहेत, असे 'सीबीएसई'कडून सांगण्यात आले आहे.

### 'क्रेडिट' होणार जमा ॲकॅडमिक बँकेत

»विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार मिळणारे क्रेडिट हे 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'मध्ये जमा करता येणार आहे. त्यासाठी शाळांना अपार आयडीचा किंवा डीजिलॉकरचा वापर करावा लागणार आहे. त्यासाठी 'सीबीएसई'ने संलग्न शाळांना प्रणालीत सहभागी होण्याचे आवाहन केले असून, त्यासाठी लिंक दिली आहे. या पथदर्शी प्रकल्पात सहभागी होणाऱ्या शाळांना मंडळाकडून मार्गदर्शन करण्यात येईल, असे 'सीबीएसई'ने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

---

# यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस...

### » भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली शक्यता

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



यंदा एक जून ते ३० सप्टेंबर, या चार महिन्यांत देशात सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्यूंजय महापात्रा म्हणाले, जगभरातील स्थिती मोसमी पावसाला पोषक आहे. त्यामुळे सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के मोसमी पावसाचा अंदाज आहे. प्रशांत महासागरातील एल-निनोची स्थिती सध्या सक्रिय आहे. जूनच्या सुरुवातीपर्यंत एल-निनो निष्क्रिय स्थितीत जाईल आणि ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये ला-निना सक्रिय होईल. हिंद महासागर द्विध्रुविता (इंडियन ओशन डायपोल, आयओडी) सध्या निष्क्रिय आहे. जूनच्या सुरुवातीस आयओडी सक्रिय होईल. युरोशियातील (युरोप आणि आशिया) बर्फाच्छादित क्षेत्र मार्च-एप्रिलमध्ये सरासरीपेक्षा कमी राहिले, ही सर्व स्थिती नैऋत्य मोसमी पावसासाठी पोषक आहे. त्यामुळे सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. मध्य भारत, दक्षिण भारत, उत्तर भारतात चांगला पाऊस पडण्याचा अंदाज असला तरीही, जम्मू-काश्मीर, लडाख, ईशान्य भारत. ओडिशा, छत्तीसगड, झारखंड आणि पश्चिम बंगालच्या काही भागात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

### ला-निना काळात सरासरीपेक्षा जास्त पाऊस

» ला-निनाच्या काळात आजवर सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्याचे निरीक्षण आहे. अपवाद वगळता ला-निना काळात नैऋत्य मोसमी पाऊस वेळेत केरळमध्ये दाखल होऊन, निर्धारीत वेळेत देशभरात पोहचतो, असेही महापात्रा म्हणाले.

# धंगेकरांना आणखी एक धक्का!

## काँग्रेसचे आबा बागुल फडणवीसांच्या भेटीला!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांना एका मागून एक,धक्के बसत आहेत. लोकसभेची उमेदवारी मिळाली नाही म्हणून इच्छुक असलेले काँग्रेसचे माजी उपमहापौर आबा बागुल यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेण्यासाठी थेट नागपूर गाठल्याचे वृत्त आहे.**



त्यामुळे महविकास आघाडीच्या गोटात खळबळ उडाली आहे.बागुलांच्या या पावित्र्याचे, आम्ही सर्व मिळून रवींद्र धंगेकरांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणू अशा वल्गना करणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांमध्ये अजूनही अलबेल नसल्याचे समोर आले आहे. रवींद्र धंगेकर हे कसब्याचे आमदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या कसबा विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून विजयी झाले आणि आमदार झाले. त्यानंतर त्यांना पुणे लोकसभेचीही उमेदवारी देण्यात आली. मात्र, याला काँग्रेस पक्षाच्या स्थानिक नेत्यांकडून कोणी उघड तर कोणी छुपेपणाने विरोध पहिल्यापासून दर्शवला आहे. त्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढतच असून धंगेगेकरांच्या समोर यामुळे मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. सुरुवातीपासून नाराज असलेले आबा बागुल यांनी आपली नाराजी काँग्रेस भवन येथील महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ मुख्य निदर्शने करून दर्शवली होती. त्यानंतर काँग्रेस पक्षांतर्गत बैठकांना आबा बागुल यांनी दांडी मारली होती. आता आबा बागुल यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी नागपूर गाठल्याचे वृत्त आहे.

### मोहोळ यांच्या मताधिक्क्यात वाढ होणार

» आबा बागुल हे काँग्रेस पक्षाचे जुने कार्यकर्ते आणि नेते आहेत. त्यांचे पर्वती मतदारसंघात चांगले काम आहे.त्यांना मानणारा एक मोठा मतदार वर्ग आहे. आबा बागुलांनी त्यांच्या प्रभागामध्ये अनेक उपक्रम राबवलेले आहेत. विशेष म्हणजे ज्येष्ठांना काशी यात्रा आणि नवरात्र महोत्सव यामुळे त्यांचा नावलौकिक पर्वती विधानसभा मतदारसंघात मोठा आहे.पर्वती मतदार संघात भाजपच्या विद्यमान आमदार माधुरी मिसाळ तसेच भाजपचे माजी सभागृह नेते आणि भाजपचे लोकसभा निवडणूक समन्वयक श्रीनाथ भीमाले यांचीही ताकद मोठी आहे. आता त्याला जोड आबा बागुलांची मिळाली तर महायुतीचे उमेदवार मुरलीधर यांची ताकद पर्वती मतदार संघात वाढून मोहोळ यांच्या मताधिक्क्यात आणखी वाढ होणार आहे.

## आमच्या प्रचारावर लक्ष ठेवण्यापेक्षा, १५ वर्षे काय केलं ते सांगावं

### खा. डॉ. अमोल कोल्हे यांचे आढळराव पाटील यांना सडेतोड उत्तर

।राजगुरूनगर । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शिरूर लोकसभा मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडीच्या दोन्ही उमेदवारांमध्ये शाब्दिक चकमक पाहायला मिळत आहे. यामध्ये माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर टीका करताना निष्ठा, संसदरत्न, चांगली भाषणे याशिवाय डॉ. कोल्हे यांच्याकडे प्रचारात मुद्दे नाही असे सांगितले. त्यावर माध्यमांशी बोलताना डॉ. कोल्हे यांनी आढळराव पाटील यांच्या टीकेला सडेतोड उत्तर दिले आहे.**





माध्यमांशी बोलताना डॉ. कोल्हे म्हणाले की, मला हे तीनही मुद्दे ठाऊक नव्हते हे आढळराव पाटील यांनी सांगितले. त्यामुळे त्यांचे धन्यवाद, तीन टर्म खासदार राहिलेल्या वयस्कर नेत्यांनी आपण १५ वर्षे काय केलं ते सांगावं, आपण पुढे काय करणार आहोत ते सांगावं, समोरच्यावर टीका म्हणजे प्रचार नाही, प्रचारात काय मुद्दे आहेत, काय नाहीत इतक्या बारकाईने आमच्या प्रचाराकडे लक्ष ठेवतात त्यामुळे त्यांना धन्यवाद देतो. डॉ. कोल्हे पुढे म्हणाले निष्ठा हा शब्द उच्चारताना आढळराव यांना त्रास होत असेल, म्हणून त्यांना मुद्दा भरकटविण्यासाठी हे असं बोलावं लागत आहे. १५ वर्षात केलेली कामे आणि पाच वर्षात केलेली कामे ही लोकांच्या समोर आहेत. त्यामुळे जनता ठरवतील कोण उजवा आहे. त्यामुळे उमेदवारांनी एकमेकांचे मूल्यमापन करण्यापेक्षा जनतेला ठरवू द्या.गेल्या दोन दिवसांपूर्वी खेड विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याच्या बातम्या विरोधकांनी पेरल्या होत्या.

कोणा एकाला विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारीचा शब्द दिल्याच्या कथित चर्चा सुरू होत्या त्यावर बोलताना खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, पाण्यात म्हैस आणि बाजारात मोल अशी गोष्ट नको, सद्या लोकसभेच्या निवडणुकीचा प्रचार सुरू आहे, माझ्यासोबत हिरामण सातकर अतुल देशमुख, बाबाजी काळे, अशोक खंडेभारड, रामदास धनवटे, विजय डोळस हे सर्व महाविकास आघाडीतील नेते एकजुटीने लोकसभेचा प्रचार करत आहेत, त्यामुळे विरोधकांना ग्राउंडवर प्रतिसाद मिळत नाही. महाविकास आघाडीत मिठाचा खडा टाकायचा म्हणून असे प्रकार सुरू आहे. गेल्या दोन दिवसांपूर्वी खेड विधानसभा मतदारसंघातील दौरा रद्द होण्याचे कारण म्हणजे मला इतर मतदारसंघात देखील पक्षाच्या संघटनेसाठी काम करावं लागतं.

या गोष्टीची कदाचित विरोधकांना सवय नाही. त्यांना गैरसमज पसरविण्यात आनंद मिळतो. महायुती एकसंध आहे. विधानसभा निवडणुकीच्या वेळी विधानसभेचे उमेदवार वरिष्ठ नेते ठरवतील. त्यामुळे आत्ताच मिठाचा खडा टाकून असुरी आनंद घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा हा प्रयत्न कधीही सफल होणार नाही.शिरूर लोकसभा मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडीच्या दोन्ही उमेदवारांमध्ये शाब्दिक चकमक पाहायला मिळत आहे. यामध्ये माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर टीका करताना निष्ठा, संसदरत्न, चांगली भाषणे याशिवाय डॉ. कोल्हे यांच्याकडे प्रचारात मुद्दे नाही असे सांगितले.

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद

» दरम्यान यावेळी खासदार डॉ. कोल्हे यांनी कांद्याच्या शेतात जाऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी महिला मजुरांनी डॉ. कोल्हे यांना कांदे भेट दिले त्यावर डॉ. कोल्हे म्हणाले की ही भेट नसून या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वेदना आहेत. माता भगिनींची तळमळ आहे, सरकारला काहीही याचा फरक पडत नाही. महाराष्ट्रात साडेतीन जिल्हे आहेत जिथे सर्वाधिक कांदा पिकतो. महायुतीतील नेते वयक्तिक टीका करण्यात व्यस्त आहेत पण शेतकऱ्यांनाच्या प्रश्नावर कोणी बोलत नाही.याशिवाय दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. लोकांचा अपेक्षा भंग झाला आहे पाणी आणि चारा टंचाई यावर कोणी बोलत नाही. राजकीय मेळावे घेऊन याला पाडू त्याला पाडू अशी भाषा केली जाते परंतु शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कोणी बोलत नाही.

## भाजपच्या माजी नगरसेविका लीना गरड यांनी बांधले शिवबंधन..!

# पनवेलमध्ये भाजपला खिंडार!

### शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

। पनवेल ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन, शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या प्रयत्नाने खारघर कॉलनी फोरमच्या अध्यक्षा व पनवेल महापालिकेच्या भाजपच्या माजी नगरसेविका लीना गरड यांनी शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन बांधले.**



उद्योजक मधु पाटील, मनसेचे महाराष्ट्र राज्य माथाडी कामगार सेना उपाध्यक्ष प्रशांत शिवाजीराव अनगुडे, शिंदे गटाच्या जान्ही घाडगे, भाजप उत्तरप्रदेश सेलचे गजेंद्र सिंग, विनय दुबे, नवीन पनवेल भाजपचे वार्ड अध्यक्ष तथा पेण तालुका रहिवाशी संघाचे उपाध्यक्ष नरेंद्र किशोर म्हात्रे, समाज सेवक शशिधर माळी, भाजपचे आकाश म्हात्रे, किरण म्हात्रे, विश्वनाथ पाटील, सर्जेराव पाटील यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी, कार्यकर्त्यांनी दादर येथील शिवसेना भवनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला.

#### शिवसेना पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती...

यावेळी शिवसेना नेते तथा कोकण संपर्क नेते सुभाष देसाई, शिवसेना उपनेते विजय कदम, मावळ लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील, मावळ लोकसभा समन्वयक केसरीनाथ पाटील, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील, रायगड जिल्हा सल्लागार शिरीष बुटाला, विधानसभा संपर्क प्रमुख वैभव सावंत, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक दिपक घरत, युवासेना सहसचिव अवचित राऊत, उपमहानगर प्रमुख प्रकाश गायकवाड, शहर प्रमुख खारघर गुरुनाथ पाटील, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, ग्रामीण विभागप्रमुख दत्ता फडके, महिला आघाडीच्या उपजिल्हा संघटिका रेवती सकपाळ, विधानसभा संघटिका सुजाता कदम, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील, नवीन पनवेल शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आनंद पाटील यांच्यासह शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## मावळ मतदारसंघातील सर्व २५ लाख मतदार माझे नातेवाईक!

### आपण विक्रमी मताधिक्याने निवडून येऊ, श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला विश्वास

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्व 25 लाख मतदार हे माझे नातेवाईक आहेत, असे उद्गार शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- आरपीआय- रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (सोमवारी) पत्रकार परिषदेत काढले. देशाची सुरक्षितता व गतिमान विकास यासाठी नरेंद्र मोदी हेच पुन्हा पंतप्रधान व्हावेत, अशी देशातील बहुतांश नागरिकांची भावना आहे. त्याचबरोबर गेल्या दहा वर्षात मी केलेले काम आणि मतदारसंघात सातत्याने ठेवलेला संपर्क यामुळे आपण विक्रमी मताधिक्याने निवडून येऊ, असा विश्वास बारणे यांनी यावेळी व्यक्त केला. मावळ लोकसभा मतदारसंघातील प्रचाराबाबत माहिती देण्यासाठी महायुतीच्या वतीने कासारवाडी येथील कलासागर हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.**



त्यावेळी माजी खासदार अमर साबळे, आमदार उमा खापरे, अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, भाजपच्या शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, मावळ मतदार संघ समन्वयक सदाशिव खाडे, रासपचे कार्याध्यक्ष परमेश्वर बुरले, उपाध्यक्ष अजित चौगुले तसेच अमित गोरखे, सुजाता पलांडे, नामदेव ढाके, अनुप मोरे, राजू दुर्गे, नीलेश तरस, मोरेश्वर शेडगे, माऊली थोरात, नारायण बहिरवाडे, राजेश पिल्ले, संजय मंगोडेकर, कुणाल वाव्हळकर आदी प्रमुख पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

गेल्या दहा वर्षांत मतदारसंघात केलेल्या विकास कामांचा आढावा खासदार बारणे यांनी यावेळी सादर केला. पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. महाविकास आघाडीच्या उमेदवाराकडून नात्यागोत्याचे राजकारण केले जात असल्याबद्दल पत्रकारांनी छेडले असता बारणे म्हणाले की, या मतदारसंघातील सर्व 25 लाख मतदार हे माझे नातेवाईक व हितचिंतक आहेत. विरोधी उमेदवाराबद्दल पत्रकारांनी छेडल्या असता बारणे म्हणाले की, मला तर विरोधी उमेदवाराचे नाव देखील माहित नाही. उमेदवारी अर्ज भरल्यानंतरच मला विरोधी उमेदवाराचे नाव समजेल.

#### उमेदवारी अर्ज 22 तारखेला भरणार..

आपण 22 एप्रिलला उमेदवारी अर्ज भरणार असून त्यावेळी महायुतीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती बारणे यांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार तसेच विविध मंत्र्यांच्या मावळ मतदारसंघात सभा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह महायुतीकडे स्टार प्रचारकांची मोठी यादी आहे. त्यापैकी निश्चित होतील त्या सभांची वेळोवेळी माहिती देण्यात येईल, असे ते म्हणाले.

महायुतीच्या कोणत्याही घटक पक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची नाराजी नाही. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत, या एकाच भावनेने सर्वजण मेहनत घेत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. मावळमधील सहाही आमदार महायुतीचे आहेत. बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्था देखील महायुतीच्या ताब्यात आहेत, यापूर्वी शिवसेना, भाजपा, आरपीआय युती होती. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसही सामील झाल्याने ही महायुती झाली आहे. त्यात मनसेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे, याकडेही बारणे यांनी पत्रकारांचे लक्ष वेधले.

#### पार्थ पवार यांनाही प्रचारासाठी निमंत्रण – बारणे

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा बारणे यांनी गेल्या निवडणुकीत पराभव केला होता. या पार्श्वभूमीवर पार्थ पवार आपल्या प्रचाराला येणार का, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. पार्थ पवार यांना आपण स्वतः मावळमध्ये प्रचारासाठी निमंत्रित करणार आहोत. पार्थ यांच्या आई बारामतीतून निवडणूक लढवत असल्यामुळे त्यांच्यावर सध्या मोठी जबाबदारी आहे, असे बारणे म्हणाले.

#### राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती..

» युवकांच्या बेरोजगारीबद्दल पत्रकारांनी विचारले असता बारणे म्हणाले की, याबाबत भाजपच्या जाहीरनाम्यात सविस्तर माहिती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात सव्वातीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याबाबत विविध उद्योगांशी नुकताच करार केला आहे. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.


# व्हिएतनाम युद्धाचा असाही लाभ..!



## भूमिका

**शीतयुद्धाच्या जवळपास चाळीस वर्षांच्या कालखंडात प्रदीर्घ कालावधीसाठी प्रत्यक्षात लढले गेलेले आणि लष्करी तसेच नागरी अशा दोन्ही आघाड्यांवर अत्यंत विनाशकारी म्हणून व्हिएतनामचे युद्ध गणले जाईल.**

१९५५ ते १९७५ अशी दोन दशके तत्कालीन सोव्हिएत रशिया व चीन ही साम्यवादी शक्ति विरुद्ध अमेरिकादी पाश्चिमात्य देशांची भांडवलशाही शक्ति यांच्यात, अनुक्रमे उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनाम या प्रांतांत हे युद्ध लढले गेले. या युद्धात केवळ व्हिएतनामचेच नव्हेत तर आजूबाजूच्या लाओस, कंबोडिया इत्यादी देशांचे लाखो सैनिक आणि नागरिकांनी प्राण गमावले; शिवाय 'अगदी थोड्या अवधीत युद्धाचा सोक्षमोक्ष लावण्याच्या इराद्या'ने युद्धात उतरलेल्या आणि भौगोलिक परिस्थितीचा अंदाज न आल्याने पार नियोजन फसलेल्या अमेरिकेचे देखील लाखो सैनिक हकनाक मारले गेले.असो. या लेखाचा उद्देश व्हिएतनाम युद्धाची साधकबाधक चर्चा करण्याचा निश्चितच नाही. कोणत्याही कालखंडात दोन किंवा अधिक देशांमध्ये, प्रांतांमध्ये अथवा जमातींमध्ये लढले गेलेले युद्ध त्यात भरडल्या गेलेल्या लोकांसाठी वेदनादायी असते याबद्दल कोणाचेच दुमत असणार नाही. पण प्रत्येक वाईट घटनेला एखादी आशादायक बाजूही असते.युद्धाच्या बाबतीत म्हणायचे झाल्यास आज




सर्वसामान्य वापरात असलेल्या तंत्रज्ञानांचा आणि त्यावर बेतलेल्या अनेक उपकरणांचा शोध युद्धाची निकड म्हणून झाला आहे. एखादे बाल्यावस्थेत असलेले तंत्रज्ञान युद्धाची गरज म्हणून थोड्याच वेळात परिपक्वतेकडे पोहोचल्याची उदाहरणेही सापडतात. चिप तंत्रज्ञानही या नियमाला अपवाद ठरलेले नाही.व्हिएतनामच्या युद्धात अमेरिका अधिकृतपणे १९६५च्या सुमारास सामील झाली जेव्हा अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी चालू केलेल्या 'ऑपरेशन रोलिंग थंडर'च्या अंतर्गत अमेरिकी लष्करी फौजा पहिल्यांदा व्हिएतनाममध्ये दाखल झाल्या. १९६९ पर्यंत पहिल्या तीन चार वर्षांत अमेरिकेने कम्युनिस्ट धार्जिण्या उत्तर व्हिएतनामवर अक्षरश: लाखो टन बॉम्बगोळ्यांचा वर्षाव केला. अमेरिकेच्या अपेक्षेनुसार पिटुकल्या उत्तर व्हिएतनामला शरण येण्यासाठी इतका काळ आणि एवढा बॉम्बगोळा पुरेसा होता. पण अमेरिकेच्या दुर्दैवाने उत्तर व्हिएतनाम शरण येणे तर सोडाच पण अमेरिकी आक्रमणाने त्याच्या युद्धसज्जता व लष्करी ताकदीवर (जी अमेरिकेच्या तुलनेत नगण्य होती) पुसटसा ओरखडा देखील आला नाही.अमेरिकेच्या या अपयशाचे मुख्य कारण तिला व्हिएतनामच्या भौगोलिक रचनेचे न झालेले आकलन हे होते याबद्दल काही शंकाच नाही. पण त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचं कारण म्हणजे अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांमध्ये वापरले गेलेले बॉम्बगोळे किंवा डागली गेलेली क्षेपणास्त्रं आपल्या लक्ष्याचा अचूक भेद करण्यास असमर्थ ठरत होती.अमेरिकेसारख्या विशाल लष्करी सामर्थ्य असलेल्या देशासाठी ही खचितच लाजिरवाणी गोष्ट होती.अमेरिकी संरक्षण खात्याच्या धुरीणांनी जेव्हा या अपयशाचा सखोल आढावा घेतला तेव्हा एक गोष्ट उघडपणे समोर आली. व्हिएतनाम युद्धात तोवर वापरली गेलेली मार्गनिर्देशित क्षेपणास्त्रे (गायडेड मिसाइल्स) ही मुख्यत्वेकरून निर्वात नलिका (व्हॅक्यूम ट्यूब) तंत्रज्ञानाचा वापर करून निर्माण केली गेली होती.अशा प्रकारच्या क्षेपणास्त्रांमध्ये लक्ष्याचा काटेकोरपणे माग घेण्यासाठी किंवा नियंत्रण केंद्रांकडून मिळालेल्या सूचनांप्रमाणे आयत्या वेळेला आपली दिशा, वेग किंवा अगदी अंतिम लक्ष्यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी गणन तसेच विदासंचय क्षमता असणे अनिवार्य असते; इथे तीच गरज निर्वात मालिकांचा वापर करून पूर्ण केली जात होती. व्हिएतनामचे अतिदमट हवामान, वेळी अवेळी पडणारा पाऊस आणि लढाऊ विमानांतून बॉम्बगोळ्यांचा मारा करताना वाऱ्याचा होणारा अवरोध या सर्वांमुळे निर्वात नलिकांची एकमेकांबरोबर असलेली जोडणी ढिली होऊन त्या काम करणे थांबवत. बऱ्याचदा क्षेपणास्त्र सोडल्यानंतर ते लक्ष्यावर आदळण्यापूर्वीच निर्वात नलिकांचे काम बंद पडत असे व त्यामुळे त्याच्या वेगात किंवा दिशेत जर काही बदल घडवायचे असतील तर नियंत्रण कक्षाकडून अशा संदेशांचे आदानप्रदान करणे अशक्यप्राय होत असे. व्हिएतनामच्या भूमीत चार पाच वर्षे आपली लष्करी शक्ति व मनुष्यबळ प्रचंड खर्च करूनदेखील अमेरिका यशाच्या जवळपासही पोहोचली नव्हती.

## संपादकीय »

### धडाडांची धरसोड!


*मराठवाड्यांतील शेतकरी या अवकाळीने परेशान आहेत.*

आषाढाच्या तोंडावर होणारा गारांचा वर्षाव सध्या चैत्रातच उभ्या पिकांना सहज आडवा करत असून विदर्भ, मराठवाड्यांतील शेतकरी या अवकाळीने परेशान आहेत. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र अशा अनेक प्रदेशांतील शेतकऱ्यांस हा अवकाळीचा तडाखा सहन करावा लागत असून लगडलेल्या फळबागांस असे आडवे होताना पाहणे शेतकऱ्यांसाठी किती वेदनादायी असेल याची कल्पना झोमॅटो-झेप्टोग्रस्त शहरवासीयांस असणे अवघड. हे असे हाताशी आलेला घास पळवला जाताना पाहणे आपल्या शेतकऱ्यांस नवे नाही. आधी शेतीविषयी काहीही आस नसलेल्यांनी आखलेली धोरणे, नंतर निसर्गाचा जाच.. यांच्याशी दोन हात करून पीक हाताशी येईल असे वाटावे तर बाजारपेठेचा काच! यामुळे अजूनही आपली शेती ही परावलंबीच राहताना पाहावे लागते. शेतीसाठी निसर्गाचे सहकार्य सगळीकडेच आवश्यक असते हे खरे.

कायद्यासमोर सर्व जण समान आहेत. जात, धर्म, वंश किंवा जन्मस्थान यांच्यावरून राज्याने नागरिकांमध्ये भेद करता कामा नये. तसेच नागरिकांनीही परस्परांशी वागताना हा भेद करू नये. असं सारं मान्य केलेलं असतानाही राज्यसंस्था स्त्रिया आणि बालके यांच्यासाठी विशेष कायदे करू शकते.

# सकारात्मक भेदभाव म्हणजे काय?

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती यांच्यासाठी विशेष सवलती देऊ शकते. ही विशेष वागणूक देण्याची मुभा अनुच्छेद १५ मध्येच आहे. 'एका बाजूला समानता म्हणायचं आणि दुसऱ्या बाजूला काही समूहांना विशेष सवलती द्यायच्या, हे काही बरोबर नाही', 'हे समतेच्या तत्त्वाला अनुसरून नाही'- असं अनेकांना वाटतं; मात्र असं करण्यामागचा उद्देश लक्षात घेतला पाहिजे.एक उदाहरण लक्षात घेऊया. धावण्याची स्पर्धा आहे, अशी कल्पना करा. एका ठरावीक ठिकाणापासून धावण्याची स्पर्धा सुरू होते आणि एका विशिष्ट ठिकाणावर पोहोचायचं असतं. या स्पर्धेसाठी सुरुवातीला सर्व जण एका समान बिंदूपाशी हवेत. जेव्हा सूचना दिली जाईल की आता धावायला सुरुवात करा तेव्हाच स्पर्धा सुरू होईल; पण समजा काही लोक स्पर्धा सुरू होणार आहे त्या रेषेच्या कित्येक मैल पुढे असतील तर काय होईल? सगळे जण समान बिंदूपाशी नसताना स्पर्धा सुरू झाली,



तर जे अगोदरच पुढे आहेत तेच ही स्पर्धा जिंकतील. ही स्पर्धा न्याय्य असणार नाही. हे जसं धावण्याच्या स्पर्धेत होतं तसंच समाजातही होतं. समाजातले काही घटक हे आधीच पुढे गेलेले आहेत तर काही बरेच मागे राहिले आहेत. अशा वेळी सर्वांना समान असेल अशी भूमी तयार करावी लागते. म्हणजे समाजातल्या काही घटकांना वर्षानुवर्षे शिक्षण घेता आलं नाही. त्यांना स्वत:चा विकास साधण्यासाठी पुरेशा संधी मिळाल्या नाहीत. उदाहरणार्थ, गडचिरोली जिल्ह्यात भटक्या विमुक्त जमातीमधील एखादा पालावर राहणारा विद्यार्थी आणि पुण्यातील कोरेगाव पार्कमध्ये आलिशान बंगल्यात राहणारा उच्चजातीय विद्यार्थी यांची एकाच प्रकारच्या परीक्षेतून तुलना होऊ शकते का? बिलकूल नाही कारण गडचिरोलीमधील विद्यार्थ्यांच्या भटक्या जमातीमधील समूहाचे सामाजिक आधारावर वर्षानुवर्षे शोषण झालं आहे. त्यामुळे सामाजिक आधारांचा विचार करून त्यांच्यासाठी विशेष तरतुदी करणं जरुरीचं ठरतं.इथं हे लक्षात घेतलं पाहिजे की, समाजातील या घटकांवर अन्याय सामाजिक आधारावर झाला आहे, आर्थिक आधारावर नव्हे. देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना पुरी येथील जगन्नाथ मंदिरात १८ मार्च २०१८ रोजी प्रवेश नाकारला गेला. रामनाथ कोविंद यांना हा प्रवेश का नाकारण्यात आला? कोविंद हे राजकीयदृष्ट्या विचार करता देशाचे प्रथम नागरिक. आर्थिकदृष्ट्याही ते सधन वर्गात आहेत . असं असताना कोविंद यांना एकविसाव्या शतकातही मंदिरात प्रवेश नाकारला जातो कारण ते कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातसमूहातले आहेत. २०१८ मधल्या त्या घटनेची गंभीर दखल राष्ट्रपती भवनाने घेतली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शाह यांचं भाजपातील स्थान काय आहे?

## » शाह यांच्या पुत्रप्रेमामुळे भारत विश्वचषक हरला : ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीचे टप्पे १९ एप्रिल पासून सुरु होतील. १ जूनपर्यंत ही निवडणूक चालणार आहे. अशात एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी अमित शाह आणि उद्धव ठाकरे सोडताना दिसत नाहीत. तसंच देवेंद्र फडणवीसही खास शैलीत टीका करताना दिसतातच. उद्धव ठाकरेंनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. त्या पत्रकार परिषदेत त्यांनी अमित शाह यांचं वक्तव्य खोडून काढलं आहे.**



शिवसेना आम्ही फोडलेली नाही. पुत्रप्रेमामुळे शिवसेना फुटली. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांचं कन्येवर प्रेम असल्याने फुटली” असा उल्लेख अमित शाह यांनी केला आहे. त्याबाबत उद्धव ठाकरेंना विचारलं असता त्यांनी यावरुन अमित शाह यांना जोरदार उत्तर दिलं आहे.अमित शाह यांचं भाजपातील स्थान काय आहे? आता भाजपाचे अध्यक्ष वेगळे आहेत. त्यामुळे त्यांना किती अधिकार आहेत हे तेच सांगू शकतील. मला अमित शाह यांना सांगायचं आहे की तुम्ही आणि तुमचे चेलेचपाटे वेगळ्या गोष्टी बोलत असतात. तुमच्यात आणि तुमच्या चेलचपाट्यांमध्ये एकवाक्यता असू द्या. काही दिवसांपूर्वी फडणवीस म्हणाले होते की मी पुन्हा आलो पण दोन पक्ष फोडून आलो. अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.देवेंद्र फडणवीस लग्नात येऊन ३५ पोळ्या खातील आणि नवरा-बायकोमध्ये भांडणं लावतील अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली होती. आता उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख चेलेचपाटे असा केला आहे. काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनीही टीका केली होती. आम्ही जर गडकरींच्या कामांची यादी वाचून दाखवली तर तुम्हाला चार पेले कोमट पाणी प्यावं लागेल असं फडणवीस म्हणाले होते . आता उद्धव ठाकरेंनी त्यांना चेलेचपाटे म्हणत डिवचलं आहे. अमित शाहांना मला सांगायचे आहे की, तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारत वर्ल्डकप हरलाय. महाराष्ट्रात खुलेआम गुंडाराज सुरु आहे. कोण कोठेही जाऊन गोळीबार करतय. यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. यांचे राज्य चालवण्याकडे कोणतेही लक्ष नाही. तरिही यांना जनतेची मतं पाहिजे, अशी टीकाही उद्धव ठाकरेंनी केली.अमित शाह यांनी भंडाऱ्यातील सभेत म्हटले होते की, उद्धव ठाकरे आणि शरद पवार सातत्याने भाजपने आमचा पक्ष फोडला, असे म्हणत असतात. पण मला महाराष्ट्रातील जनतेला एक गोष्ट स्पष्ट सांगायची आहे की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष भाजपने फोडले नाहीत. उद्धव ठाकरे यांचं पुत्रप्रेम आणि शरद पवारांच्या मुलीवरील प्रेमामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी हे पक्ष फुटले, असे अमित शाह यांनी म्हटले होते. याविषयी उद्धव ठाकरे यांना आजच्या पत्रकार परिषदेत विचारणा करण्यात आली. तेव्हा उद्धव ठाकरे यांनी मिश्किल शैलीत अमित शाह यांना टोला लगावला. त्यांनी म्हटले की, मला अमित शाह यांना सांगायचं आहे की, तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारत अंतिम सामना हरला आहे. मी तसं पुत्रप्रेम दाखवलं नाही, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. अमित शाह यांचे पुत्र जय शहा हे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (BCCI) अध्यक्ष आहेत. गेल्यावर्षी भारतात एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा अंतिम सामना शक्यतो.

### तुमच्या चेलेचपाट्यांना समजवा

» या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना अप्रत्यक्षपणे अमित शाह यांचा चेला म्हणून संबोधले. त्यांनी म्हटले की, अमित शाह यांचं पक्षातील स्थान नक्की काय आहे? भाजपमध्ये राष्ट्रीय अध्यक्षांना किती अधिकार असतात, हे सर्वांना माहिती आहे. अमित शाह जे बोलतात त्यामध्ये आणि त्यांच्या चेलेचपाट्यांच्या वक्तव्यामध्ये एकवाक्यता ठेवली पाहिजे. तुम्ही सांगता की आम्ही शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आम्ही फोडले नाहीत. पण देवेंद्र फडणवीस बोलतात की, मी दोन पक्ष फोडून पुन्हा आलो. अमित शाह यांची लाज त्यांचे चेलेचपाटे काढत आहेत, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.लोकसभा निवडणुकीचे टप्पे १९ एप्रिल पासून सुरु होतील. १ जूनपर्यंत ही निवडणूक चालणार आहे. अशात एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी अमित शाह आणि उद्धव ठाकरे सोडताना दिसत नाहीत. तसंच देवेंद्र फडणवीसही खास शैलीत टीका करताना दिसतातच. उद्धव ठाकरेंनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. त्या पत्रकार परिषदेत त्यांनी अमित शाह यांचं वक्तव्य खोडून काढलं आहे.

---

# मुंबई बाजार समितीतील घोटाळ्यावरून हल्लाबोल

## » नरेंद्र पाटील यांनी आ. शशिकांत शिंदे यांच्यावर चढवला हल्लाबोल

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेचा सातारा मतदारसंघाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा ‘तुतारी’ चिन्हावरील उमेदवार मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत मुतारीत घोटाळा करतो हे खूपच लांच्छनास्पद असल्याचा हल्लाबोल आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आमदार शशिकांत शिंदे यांच्यावर चढवला.**




एका-एका प्रकरणांचा उलगडा करणार घोटाळेबाजाच्या एका-एका प्रकरणांचा उलगडा आम्ही त्या-त्यावेळी करणार असल्याचा इशाराही नरेंद्र पाटील यांनी दिला. कराडमध्ये पत्रकारांशी बोलताना पाटील ते पुढे म्हणाले, अशा घोटाळेबाजाला उमेदवारी मिळते याचे खूप वाईट वाटते. याबद्दल आम्ही शरद पवारांना काहीच बोलू शकत नाही.सातारा लोकसभेचा सन २०१९ च्या निवडणुकीत मी उमेदवार होतो. सध्याच्या उमेदवारांनी त्यावेळी बेंबीच्या देठापासून आपणाला प्रत्यक्षात विरोध केला. एका माथाडी चळवळीत काम केल्यानंतर प्रत्येक निवडणुकीत त्यांच्या विजयासाठी आम्ही व माझ्या परिवाराने प्रयत्न केलेत. त्यांचा शेवटचा विजय कोरेगाव विधान मतदारसंघातून झाला.सन २०१९ मध्ये आमच्यातील काहींनी त्यांना हाताशी धरून आमच्या विरोधात कटकारस्थान रचले. आता ते उमेदवार असल्याने त्यांना ‘रिटर्न गिफ्ट’ देण्याची संधी आलीय. निवडणुकीचा अजून बराचसा काळ बाकी आहे. त्यात एका-एका प्रकरणाचा उलगडा करणार असल्याचा इशारा पाटील यांनी दिला.शशिकांत शिंदेंनी निवडणूक आली की, काहीतरी प्रकरणे काढून रडीचा डाव खेळू नका असा खिल्ली महायुतीच्या नेत्यांची उडवली असल्याकडे लक्ष वेधले असता, शशिकांत शिंदे यांनी जर काहीच केले नसेल तर त्यांनी घाबरायची गरज नाही.

### माथाडी नेता कोण ते दिसेल

» बाळासाहेब सोळस्कर त्यावेळी अध्यक्ष होते आणि शशिकांत शिंदे संचालक होते. त्यामुळे त्यांना काहीच केले नाही असे वाटत असेल तर त्यांनी घाबरायची गरज नसल्याचे नरेंद्र पाटील म्हणाले.भाजपने माथाडी कामगारांत फूट पाडण्याचे काम केल्याचा आरोप शशिकांत शिंदेंनी केला असल्याबाबत विचारले असता पाटील म्हणाले, माथाडी कामगारांचे प्रश्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोडवत असल्यास फूट कुणी पाडली? माथाडींच्या प्रमुख प्रश्नांवर ज्या पक्षाने कधीही गांभीर्याने पाहिले नाही. ज्यांनी काँग्रेस सोबत जावून माथाडींचे प्रश्न प्रलंबित ठेवण्याचे काम केले. तरी अशा उमेदवाराला आम्ही उत्तर काय द्यायचे असा सवाल करून, आता खरा माथाडीचा नेता कोण, माथाडी कामगार कोणाच्या पाठीशी आणि खऱ्याअर्थाने माथाडी कामगारांच्या समस्या कोण सोडवतोय हे लवकरच दिसून येईल असे नरेंद्र पाटील यांनी या वेळी बोलताना सांगितले.

# ‘RBI बँक सरकारची चीअर लीडर’!

## माजी गव्हर्नरकडून युपीए सरकारवर खळबळजनक आरोप

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**युपीए सरकारच्या काळात प्रणव मुखर्जी आणि पी. चिदंबरम अर्थमंत्री असताना अर्थ मंत्रालयाकडून रिझर्व्ह बँकेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात होता, असा दावा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी आपल्या पुस्तकात केला आहे. व्याज दर कमी ठेवून युपीएच्या काळात खूप आर्थिक प्रगती होत आहे, असे चित्र निर्माण करण्यासाठी दबाव टाकला जात होता, असा खळबळजनक दावा सुब्बाराव यांनी केला आहे.**



सुब्बाराव यांनी लिहिलेल्या ‘जस्ट ए मर्सिनरी?: नोट्स फ्रॉम माय लाइफ अँड करियर’ या पुस्तकात म्हटले की, देशाच्या मध्यवर्ती बँकेची स्वायत्तता राखण्याचे आकलन आणि समज तेव्हाच्या सरकारमध्ये नव्हती. मी सरकार आणि आरबीआय बँक या दोन्ही ठिकाणी राहिल्यामुळे मी अधिकाराने सांगू शकतो की, आरबीआयच्या स्वायतत्तेबद्दल केंद्र सरकारला अजिबात सोयरसुतक नव्हते.डी. सुब्बाराव यांनी आपल्या पुस्तकात म्हटले की, सरकारच्या धोरणांबाबत आरबीआयने चीयरलीडर बनावे, अशी सरकारची इच्छा असून आपली त्यासाठी सहमती नव्हती, असा दावा “रिझर्व्ह बँक सरकारची चीयरलीडर?”, या शीर्षकाखाली पुस्तकात केला आहे.सुब्बाराव यांनी २००७ ते २००८ या काळात वित्त सचिव म्हणून काम केले. त्यानंतर ५ सप्टेंबर २००८ पासून त्यांनी पुढे पाच वर्ष आरबीआयचे गव्हर्नर म्हणून काम केले. विशेष म्हणजे १६ सप्टेंबर रोजी अमेरिकेत लेहमन ब्रदर्स आर्थिक संकट कोसळले होते. त्याच्या काही दिवस आधीच त्यांनी आरबीआयचे गव्हर्नर म्हणून पदभार स्वीकारला होता. या काळात जगभरात आर्थिक मंदी आलेली पाहायला मिळाली.डी. सुब्बाराव यांनी प्रवण मुखर्जी अर्थमंत्री असतानाचा एक प्रसंग पुस्तकात कथन केला. ते म्हणाले, वित्त सचिव अरविंद मायाराम आणि मुख्य आर्थिक सल्लागार कौशिक बसू यांनी आमच्या आर्थिक अंदाजाचा विरोध करून त्यांचे आकडे आमच्यावर थोपण्याचा प्रयत्न केला होता. माझ्यादृष्टीने हे जरा जास्तच झाले होते. एवढेच नाही तर मायाराम एका बैठकीत म्हणाले होते की, जगात सगळीकडे सरकार आणि केंद्रीय मध्यवर्ती बँक एकमेकांना सहकार्य करतात. मात्र भारतातच रिझर्व्ह बँक जरा बदमाश आहे.

### रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बदमाश

» रिझर्व्ह बँकेच्या धोरणांबद्दल चिदंबरम आणि मुखर्जी या दोघांशीही माझा नेहमीच संघर्ष होत असे. दोघांनीही व्याजदर कमी ठेवण्यासंदर्भात दबाव टाकला होता. मात्र दोघांची काम करण्याची शैली वेगवेगळी होती. चिदंबरम हे व्यावसायिक वकिलाप्रमाणे त्यांची बाजू मांडत वाद घालायचे. तर मुखर्जी हे नम्रतापूर्वक आपले म्हणणे रेटण्याचा प्रयत्न करत असत. आपले म्हणणे शांतपणे मांडल्यानंतर ते वाद घालण्याचे काम आपल्या अधिकाऱ्यांवर सोपवत असत.युपीए सरकारच्या काळात प्रणव मुखर्जी आणि पी. चिदंबरम अर्थमंत्री असताना अर्थ मंत्रालयाकडून रिझर्व्ह बँकेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात होता, असा दावा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी आपल्या पुस्तकात केला आहे. व्याज दर कमी ठेवून युपीएच्या काळात खूप आर्थिक प्रगती होत आहे, असे चित्र निर्माण करण्यासाठी दबाव टाकला जात होता, असा खळबळजनक दावा सुब्बाराव यांनी केला आहेदेशाच्या मध्यवर्ती बँकेची स्वायत्तता राखण्याचे आकलन आणि समज तेव्हाच्या सरकारमध्ये नव्हती. मी सरकार आणि आरबीआय बँक या दोन्ही ठिकाणी राहिल्यामुळे मी अधिकाराने सांगू शकतो की, आरबीआयच्या स्वायतत्तेबद्दल केंद्र सरकारला अजिबात सोयरसुतक नव्हते.

# पुढची निवडणूक ‘वन नेशन, वन इलेक्शन’ होणार?

## हा अहवाल अंमलात आणू शकलो, तर देशाला खूप फायदा : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशात ‘वन नेशन, वन इलेक्शन’च्या मुद्यांवर अनेक दिवसांपासून चर्चा सुरु आहेत. या मुद्यांवरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये अनेकदा आरोप-प्रत्यारोपदेखील झाले आहेत. ‘वन नेशन, वन इलेक्शन’वरुन विरोधकांनी अनेकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. काही दिवसांपूर्वी ‘वन नेशन, वन इलेक्शन’बाबतचा एक अहवाल माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने सरकारकडे दिला. यावर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘वन नेशन,वन इलेक्शन’ मुद्यांवर भाष्य केले आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, “वन नेशन वन इलेक्शन ही आमची कटिबद्धता आहे. यासंदर्भात आम्ही संसदेमध्येही चर्चा केली. याबाबत आम्ही एक समितीही स्थापन केली होती. या समितीचा अहवालही आलेला आहे. या अहवालामध्ये अनेकांनी सकारात्मक आणि नाविन्यपूर्ण सूचना केल्या आहेत. जर आम्ही हा अहवाल अंमलात आणू शकलो, तर देशाला खूप फायदा होईल”, असे पंतप्रधान मोदी यांनी ‘एएनआय’ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईडी-सीबीआयच्या कारवाईच्या मुद्यांवरही भाष्य केले. ते म्हणाले, “ईडीच्या कारवाईमध्ये ९७ टक्के अराजकीय व्यक्तींवर कारवाई झाली आणि फक्त तीन टक्के राजकीय लोकांवर कारवाई झाली. ईडीने गेल्या १० वर्षात २२०० कोटी कॅश जप्त केले. मात्र, २०१४ सालच्या आधी फक्त ३४ लाख रुपये कॅश जप्त केले होते”. दरम्यान, युक्रेनमध्ये युद्ध सुरु होते, त्यावेळच्या मुद्यांवरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाष्य केले. भारतातील विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे आपल्या देशात आणण्यात आल्याचे सांगत ही एक मन हेलावणारी घटना होती, असे ते म्हणाले.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष कामाला लागलेले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याही प्रचाराचा धडाका उडाला आहे. तसंच, पंतप्रधान नरेंद्र मोदी माध्यमांनाही मुलाखती देत आहेत. एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी पुढील २५ वर्षांचं नियोजन स्पष्ट केलं. पुढील २५ वर्षांत देश कसा पाहिजे, याबाबत त्यांनी नियोजनाला सुरुवात केली असल्याचं त्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, “मी दीर्घकाळासाठी मुख्यमंत्री राहिलो आहे. सतत निवडणुका आणि आचारसंहिता असल्याने माझ्या राज्यातील चांगले अधिकारी दुसऱ्या राज्यात निरिक्षक म्हणून इलेक्शन ड्युटीला जायचे. त्यामुळे मला चिंता असायची की माझं राज्य कसं चालवू? कारण सतत कुठे ना कुठे निवडणुका असायच्या आणि अधिकारी जात असत. परंतु, ही माझी सुट्टी नसायची. मी निवडणुका सुट्ट्यांप्रमाणे लढवत नाही. मी तेव्हाही शंभर दिवसांचं प्लानिंग करायचो. डोक्यात ठेवून काम करतोय. त्यासाठी देशभरातील लोकांच्या सूचना मागवल्या. १५ लाखांहून अधिक लोकांनी याबाबत सूचना पाठवल्या आहेत. येणाऱ्या २५ वर्षांत भारत कसा पाहिजे यावर नागरिकांचे निवेदन घेतलं आहे. विविध विद्यापीठ, संस्थांना एकत्रित केलं. १५-२० लाख लोकांनी यावर अहवाल दिला. मग एआयच्या मदतीने त्याचं विभाजन केलं”, असं मोदी म्हणाले.विभाजनानंतर प्रत्येक विभागात अधिकाऱ्यांची टीम पुढील २५ वर्षांसाठी बनवली. अधिकाऱ्यांकडून या कामासाठी मी प्रेझेंटनेश घेतलं. प्रत्येक विभागावर दोन-अडीच तास चर्चा केली. मला वाटतं की मी हे काही कागदपत्र बनवतो आहे, हे व्हिजन मोदींची पोपटपंची नाहीय. १५-२० लाख लोक इन्पुट देत आहे म्हणजे संपूर्ण देशाचा यात समावेश आहे.

### शंभर दिवसांत महत्त्वाचे निर्णय

» मी तीन विभागात याचं नियोजन केलं आहे. २५ वर्षांचं नियोजन, मग पाच वर्षांचं आणि पुढील शंभर दिवसांचं वेळापत्रक बनवून अधिकाऱ्यांना पाठवलं आहे. २०१९ मध्येही निवडणुकीत उतरण्याआधी मी अधिकाऱ्यांना १०० दिवासांसाठी कामाला लावलं होतं. निवडणुका संपल्यानंतर मी पुन्हा कार्यरत झाल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत मी कलम ३७० हटवला,निवडणूक झाल्यानंतर हा अहवाल राज्यांना पाठवला जाणार. मग राज्यात यासंदर्भात चर्चा होईल. राज्यातून अहवाल आल्यानंतर यावर निती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांबरोबर व्यापक चर्चा होऊन अंतिम निर्णय होईल”, असं मोदींनी स्पष्ट केलं.

# गोळीबारानंतर पहिल्यांदाच बाहेर पडला सलमान खान

घरावर झालेल्या गोळीबारानंतर सध्या बॉलीवूड अभिनेता सलमान खान चांगलाच चर्चेत आला आहे. रविवारी (१४ एप्रिल ) पहाटे पाच वाजताच्या सुमारास सलमानच्या घरावर दोन अज्ञात व्यक्तींनी दुचाकीवरून येत गोळीबार केला. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. अनेक मोठमोठ्या सेलिब्रिटींनी येऊन सलमानची भेट घेतली. तसेच त्याची भेट घेण्यासाठी काही राजकीय नेते सुद्धा भाईजानच्या निवासस्थानी दाखल झाले होते. गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर सध्या मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे. अशातच सोमवारी सायंकाळी गोळीबाराच्या घटनेनंतर सलमान खान पहिल्यांदाच घराबाहेर आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अभिनेता आलिशान गाडीतून गॅलेक्सी अपार्टमेंट बाहेर पडला. तसेच सलमानच्या गाडीच्या मागे-पुढे मुंबई पोलिसांचा ताफा पाहायला मिळाला. वरिंदर चावलाच्या पापाराझी इन्स्टाग्राम पेजवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.

सलमान घराबाहेर पडताना त्याच्याबरोबर निर्माते रमेश तौरानी सुद्धा उपस्थित होते. अभिनेत्याला पोलिसांच्या मोठ्या सुरक्षेखाली घराबाहेर नेण्यात आलं. आता भाईजान पुन्हा शूटिंग सेटवर केव्हा परतणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. या सगळ्या प्रकरणावर आता खान कुटुंबीयांकडून अधिकृत निवेदन जारी करण्यात आलं आहे. सलमानचा भाऊ अरबाजने यासंदर्भात पोस्ट शेअर केली आहे.

# सुहाना अन् अनन्या पांडेचा जुना फोटो व्हायरल

आयपीएलचा प्रत्येक सामना सध्या रंगतदार होत असल्याचं पाहायला मिळत आहे. अनेक मोठमोठे बॉलीवूड सेलिब्रिटी या सामन्यांना आवर्जुन उपस्थिती लावतात. आयपीएलमधील कोलकाता नाइट रायडर्स (KKR) ही बॉलीवूड अभिनेता शाहरुख खानची टीम आहे हे आता सर्वश्रुत आहे. दरवर्षी शाहरुख त्याच्या अनेक कलाकार मित्रमंडळींना सामने पाहण्यासाठी आमंत्रित करतो. याशिवाय खेळाडूंना सपोर्ट करण्यासाठी तो स्वत: स्टेडियममध्ये उपस्थित असतो. यंदाच्या आयपीएलचा २८ वा सामना लखनौ विरुद्ध कोलकाता नाइट रायडर्स या संघांमध्ये खेळवण्यात आला. या सामन्यात शाहरुखच्या केकेआर टीमने बाजी मारली. रविवारी पार पडलेल्या या सामन्याला शाहरुखची लेक सुहाना खान आणि बॉलीवूड अभिनेत्री अनन्या पांडे उपस्थित होती.सुहाना आणि अनन्या गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकींच्या घट्ट मैत्रिणी आहेत. त्यामुळे अनन्या पांडे आयपीएलच्या सुरुवातीपासूनच केकेआरच्या बहुतांश सामन्यांना हजेरी लावत आलीये. परंतु, यावेळी अभिनेत्रीने आयपीएल दरम्यानचा एक खास फोटो शेअर करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. हा फोटो जुना असून तेव्हा नुकतीच IPL ची सुरुवात झाल्याचं या फोटोतून स्पष्ट होत आहे.अनन्याने शेअर केलेल्या जुन्या फोटोमध्ये सुहाना आणि अनन्या दोघीही लहान दिसत आहेत. याशिवाय या दोघींच्या बाजूला अभिनेता शाहरुख खान, हृतिक रोशन आणि अनन्याचे वडील चंकी पांडे पोज देत असल्याचं पाहायला मिळत आहे.

# नेहा धुपिया झाली अवाक

२२ मार्चपासून आयपीएलच्या हंगामाला सुरूवात झाली आणि प्रत्येक टीमने आपली जोरदार खेळी दाखवली. रविवारी १४ एप्रिलला आयपीएलचे तगडे संघ एकमेकांसमोर आले होते. मुंबई इंडियन्स विरुदध चेन्नई सुपर किंग्ज्सचा सामना काल भारताने पाहिला. या अटीतटीच्या सामन्यात शेवटपर्यंत कोण बाजी मारेल याचा नेम काही लागत नव्हता. परंतु चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सवर २० धावांनी विजय मिळवला. आयपीएल सामन्याला अनेक कलाकार उत्साहाने हजेरी लावतात. कालच्या सामन्याला नेहा धुपिया आणि तिचा पती अंगद बेदी, करिना कपूर खान तसेच जॉन अब्राहम यांनी हजेरी लावली होती. आज नेहाने तिच्या सोशल मीडियावर कालच्या सामन्याचे हायलाईट्स शेअर केले. यात नेहाने सामन्यातील काही फोटोज आणि व्हिडीओज शेअर केले आहेत. धोनीच्या सलग तीन षटकाराने सगळ्यांनाच अचंबित केलं पण नेहाचे हावभाव काही औरच होते. नेहा आवाक झाली होती. नेहाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय.नेहाच्या व्हायरल झालेल्या या व्हिडीओवर नेटकर्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. एवढ तोंड कोण खोलतं?" असं एका नेटकर्याने लिहिलं. " धोनीने षटकार मारल्यावर जी रिॲक्शन दिली ती खूप आवडली" असं दुसर्याने लिहिलं. "जॉन आणि करिनाने' जिंदगी खल्लास'सारखा पोज दिलाय." असं एकजण म्हणाला.काल संध्याकाळच्या सामन्यातील माझे स्वतःचे हायलाइट्स! खेळ आवडला.



# आमचा पोलिसांवर विश्वास; अरबाज

बॉलीवूडचा भाईजान सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर १४ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास गोळीबार झाला. दुचाकीवर आलेल्या दोघांनी गोळ्या झाडल्या. घरासमोरील सीसीटीव्ही फुटेजमधून या दोन हल्लेखोरांबद्दल माहिती कळली. हे सगळं केवळ प्रसिद्धीसाठी सुरू असल्याचं सलमान खानचे वडील सलीम खान यांनी म्हटलं अशा चर्चा सुरू होत्या. परंतु या हल्ल्यानंतर खान कुटुंबातील कोणत्याही सदस्याने याबद्दल भाष्य केलं नसल्याचं अरबाज खानने सांगितलं. अरबाज खानने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर याबाबत एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात अरबाजने लिहिलं, "मोटारसायकलवर असलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याची घटना नुकतीच सलीम खान यांचं निवासस्थान असलेल्या गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये घडली. आमचे संपूर्ण कुटूंब यामुळे खूप अस्वस्थ आहे. या धक्कादायक घटनेने कुटुंबीय हादरले आहेत. दुर्दैवाने काही लोक अशी आहेत जी आमच्या कुटूंबाच्या अगदी जवळची आहेत असं भासवून माध्यमांसमोर विधान करतायत आणि हा एक पब्लीसिटी स्टंट आहे आणि यामुळे आम्हाला कोणताही त्रास झाला नाही असा दावा करतायत. या विधानांना गांभीर्याने घेतले जाऊ नये. "अरबाज खानने पुढे लिहिलं, "सलीम खान कुटूंबातील कोणत्याही सदस्याने या घटनेबाबत अधिकृत विधान किंवा माहिती अद्याप दिली नाही आहे. या वेळेस संपूर्ण कुटूंब या दुर्दैवी घटनेसाठी पोलिसांना तपासात सहकार्य करत आहे."आमचा मुंबई पोलिसांवर विश्वास आहे आणि आमच्या कुटुंबाच्या रक्षणासाठी आणि सुरक्षिततेसाठी ते त्यांच्या क्षमतेनुसार सर्व काही करतील, असे आश्वासन त्यांनी आम्हाला दिले आहे. तुमच्या प्रेमाबद्दल आणि पाठिंब्याबद्दल सर्वांचे आभार." असंही अरबाजने नमूद केलं.सलमान खानच्या घरावर झालेल्या हल्ल्यानंतर सुरक्षा वाढविण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबाबत सलमान खानशी संवाद साधला होता. तर मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी रविवारी संध्याकाळी अभिनेत्याच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली. सध्या या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत.

# भूमी पेडणेकरला नेटकऱ्याने केले ट्रोल

बॉलीवूड अभिनेत्री भूमी पेडणेकर अभिनयासह तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही नेहमीच चर्चेत असते. भूमी व तिची बहीण समीक्षा अनेकदा एकत्र फिरताना दिसतात. दोघी त्यांच्या सोशल मीडियावर एकत्र फोटोज आणि व्हिडीओजही शेअर करीत असतात. अनेकदा त्या दोघी सारख्या दिसतात, असंही म्हटलं गेलंय. पण, त्यांच्या सारख्या दिसण्यावरून पेडणेकर बहिणींना ट्रोलिंगचा सामना करावा लागतोय. भूमी आणि समीक्षानं तीन दिवसांपूर्वी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला; ज्यात दोघी बहिणी एकत्र तयार होताना आणि दोघी कॅमेऱ्यासमोर एकत्र लिपस्टिक लावताना दिसतायत. 'मी आणि माझी जवळची मैत्रीण', अशी कॅप्शन समीक्षानं या व्हिडीओला दिली आहे. या व्हिडीओमुळे अनेकांनी पेडणेकर बहिणींना ट्रोल केलंय. या ट्रोलला समीक्षानं सडेतोड उत्तरही दिलंय. पेडणेकर बहिणींच्या या व्हिडीओवर एका नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं, "जेव्हा एकच सर्जन तुमची सर्जरी करतो, तेव्हा असं घडतं. आम्ही दोघांमधला फरक ओळखू शकत नाही." "एकच सर्जन की एकच पालक? कदाचित?", असं खणखणीत उत्तर समीक्षानं कमेंट करीत दिलं.लाइफ इन प्लॅस्टिक इट्स सो फॅनटॅस्टिक" बार्बी गाण्यातील हे कडवं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. त्यावर "काय प्लॅस्टिक?" असा प्रत्युत्तरादाखल प्रश्न समीक्षानं विचारला.तुम्ही दोघी जुळ्या आहात का?", "भूमीची बहीण अरबाज खानच्या बायकोसारखी दिसतेय." "यातली भूमी कोण आहे हेच कळत नाही." अशा प्रकारच्या अनेक कमेंट्स या व्हिडीओवर आल्या आहेत.दरम्यान, भूमी पेडणेकरची बहीण समीक्षा ही वकिल व उद्योजक आहे. भूमीच्या आगामी चित्रपटाबाबत सांगायचं झाल्यास, 'मेरे हजबंड की बीवी' चित्रपटात भूमी, अर्जुन कपूर व रकुल प्रीत सिंग हे प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होईल.बॉलीवूड अभिनेत्री भूमी पेडणेकर अभिनयासह तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही नेहमीच चर्चेत असते. भूमी व तिची बहीण समीक्षा अनेकदा एकत्र फिरताना दिसतात. दोघी त्यांच्या सोशल मीडियावर एकत्र फोटोज आणि व्हिडीओजही शेअर करीत असतात. अनेकदा त्या दोघी सारख्या दिसतात, असंही म्हटलं गेलंय. पण, त्यांच्या सारख्या दिसण्यावरून पेडणेकर बहिणींना ट्रोलिंगचा सामना करावा लागतोय. भूमी आणि समीक्षानं तीन दिवसांपूर्वी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला.



# दिनेश कार्तिकची झुंज व्यर्थ!

## हैदराबादने रेकॉर्डब्रेक कामगिरी करत विजय मिळवला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील ३०वा सामना बंगळुरुच्या एम चिन्नास्वामीच्या मैदानावर खेळला गेला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबाद आमनेसामने आले होते. ज्यामध्ये सनरायझर्स हैदराबादने रेकॉर्डब्रेक कामगिरी करताना आरसीबीवर २५ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने ट्रेव्हिस हेडच्या शतकी खेळीच्या जोरावर विक्रमी २८७ धावा केल्या होत्या. मात्र, प्रत्युत्तरात आरसीबीचा संघ ७ बाद २६२ धावाच करु शकला. आरसीबीकडून दिनेश कार्तिकने सर्वाधिक ८३ धावांचे योगदान दिले.**



कर्णधार फाफ डु प्लेसिस आणि दिनेश कार्तिक यांच्या शानदार खेळीनंतरही आरसीबी संघ सनरायझर्स हैदराबादविरुद्ध विजय नोंदवू शकला नाही. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने ट्रॅव्हिस हेडचे शतक आणि हेनरिक क्लासेनच्या अर्धशतकाच्या जोरावर २० षटकांत ३ बाद २८७ धावा केल्या. आयपीएलच्या इतिहासातील ही सर्वात मोठी धावसंख्या ठरली. प्रत्युत्तरात आरसीबीनेही शानदार फलंदाजी केली, परंतु लक्ष्य इतके मोठे होते की संघ २५ धावांनी मागे राहिला. आरसीबीला २० षटकात ७ विकेट्सवर केवळ २६२ धावा करता आल्या. दोन्ही संघांमधील या सामन्यात एकूण ५४९ धावा झाल्या. सनरायझर्स हैदराबादकडून कर्णधार पॅट कमिन्सने ४३ धावांत तीन विकेट्स घेतल्या.दिनेश कार्तिकने ३५ चेंडूत ५ चौकार आणि ७ षटकार मारत ८३ धावांची धाडसी खेळी खेळून आरसीबीला अनपेक्षित विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याला यश आले नाही. हा हंगाम आरसीबीसाठी चांगला राहिला नाही आणि संघाला सातपैकी केवळ एकच सामना जिंकता आला आहे. या सामन्यात कार्तिकने यंदाच्या हंगामातील १०८ मीटरचा सर्वात लांब षटकार मारला. आरसीबीचा हा सलग पाचवा पराभव असून गुणतालिकेत ते तळाच्या १०व्या स्थानावर कायम आहे. त्याचबरोबर या शानदार विजयासह हैदराबादचा संघ आठ गुणांसह चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. हैदराबादने या मोसमात आतापर्यंत सहापैकी चार सामने जिंकले आहेत, तर दोन सामने गमावले आहेत. आरसीबीच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण म्हणजे या संघाची खराब गोलंदाजी राहिली. आरसीबीची गोलंदाजी कमकुवत दिसून आली नाही. या सामन्यात सिराजला प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर ठेवण्यात आले होते आणि त्याच्या जागी लॉकी फर्ग्युसनला आणण्यात आले होते, मात्र या सामन्यात त्याने ४ षटकात ५२ धावा देत २ विकेट्स घेतल्या. विल जॅकने ३ षटकांत ३२ धावा दिल्या तर रिस टोपलीने ४ षटकांत ६८ धावा दिल्या.

### लोमररने एक षटक 18 धावा दिल्या

कहाणी इथेच संपली नाही, यश दयालने ४ षटकात ५१ धावा दिल्या तर विजय कुमारने ४ षटकात ६४ धावा दिल्या. महिपाल लोमररने एक षटक टाकून १८ धावा दिल्या. या सामन्यात आरसीबीच्या प्रत्येक गोलंदाजाने १३ पेक्षा जास्त इकॉनॉमी रेटने धावा दिल्या. या सामन्यात आरसीबीचे गोलंदाज पहिल्या डावात कोणत्याही वेळी हैदराबादच्या फलंदाजांवर वर्चस्व गाजवू शकले नाहीत आणि दडपणाखाली पूर्णपणे विखुरलेले दिसले. हैदराबादच्या फलंदाजांनी आरसीबीच्या गोलंदाजीवर दमदार फटकेबाजी केली आणि त्यांना वर्चस्व गाजवण्याची संधी दिली नाही. या कमकुवत आक्रमणाच्या जोरावर आरसीबी या मोसमात अधिक चांगली कामगिरी करण्याची शक्यता कमी आहे.

# ट्रॅव्हिस हेडने झळकावले वादळी शतक!

## आयपीएलमध्ये ‘हा’ पराक्रम करणारा ठरला चौथा खेळाडू

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील ३० वा सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद आमनेसामने आहेत. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या या सामन्यात बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघासाठी सलामीला फलंदाजीसाठी आलेल्या ट्रेव्हिस हेडने ३९ चेंडूत शतक झळकावले. हे आयपीएलमधील चौथे सर्वात वेगवान शतक आहे. आता तो कोहली, बटलर आणि रोहितनंतर यंदाच्या हंगामात शतक झळकावणारा चौथा खेळाडू ठरला आहे.**



ट्रॅव्हिसने आरसीबीविरुद्ध ४१ चेंडूत १०२ धावांची खेळी केली. या दरम्यान त्याच्या बॅटमधून ९ चौकार आणि ८ षटकार आले. विशेष म्हणजे हेडचे हे शतक हैदराबादकडून सर्वात वेगवान शतक आहे. याआधी डेव्हिड वॉर्नरने हैदराबादकडून खेळताना ४३ चेंडूत शतक झळकावले होते. याशिवाय हैदराबादसाठी हेनरिक क्लासेनने ४९ चेंडूत शतक झळकावले आहे. आता हेडने अवघ्या ३९ चेंडूत शतक झळकावून सर्वांना मागे टाकले आहे. त्याच्या उत्कृष्ट फलंदाजीमुळे संघाची धावसंख्या सहज २०० च्या पुढे गेली.ट्रॅव्हिस हेडची आयपीएलमध्ये एंट्री २०१६ मध्ये झाली होती आणि तो २०१७ मध्ये आरसीबीकडून या लीगमध्ये खेळला होता. परंतु त्यानंतर कोणत्याही संघाने त्याला या लीगमध्ये आपल्या संघाचा भाग बनवले नाही. मात्र, २०२४ च्या लिलावात हैदराबादने त्याची निवड केली. त्यांच्या संघासाठी त्याचा संघात समावेश करण्यात आला आणि ८ वर्षांनंतर तो पुन्हा या लीगमध्ये परतला. आरसीबीविरुद्धच्या या सामन्यात ट्रॅव्हिस हेडने २० चेंडूत चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले आणि आपल्या अर्धशतकी खेळीदरम्यान त्याने ५ षटकार आणि ३ चौकार लगावले. त्याने पॉवरप्लेमध्ये म्हणजेच ६ षटकांत अर्धशतक पूर्ण केले. यानंतर त्याने वेगवान फलंदाजी करत ३९ चेंडूत चौकार मारून आपले पहिले शतक पूर्ण केले. आपल्या शतकी खेळीत त्याने ८ षटकार आणि ९ चौकार लगावले. हेडने ३९ चेंडूत शतक झळकावून एबी डिव्हिलियर्स आणि गिलख्रिस्टचा विक्रम मोडला आणि या लीगमध्ये सर्वात जलद शतक झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो चौथ्या स्थानावर पोहोचला.या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघासाठी सलामीला फलंदाजीसाठी आलेल्या ट्रेव्हिस हेडने ३९ चेंडूत शतक झळकावले.

### हेडने 39 चेंडूत शतक झळकावले

आयपीएल २०२४ मधील ३० वा सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद आमनेसामने आहेत. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या या सामन्यात बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघासाठी सलामीला फलंदाजीसाठी आलेल्या ट्रेव्हिस हेडने ३९ चेंडूत शतक झळकावले.